## चालू खात्यातील व्यवहार - मुक्तिकरण
## ए.पी. (डिआयआर मालिका) परिपत्रक क्र.३(जुलै १७, २००३)

भारतीय रिझर्व बँक
चलन नियंत्रण विभाग
मध्यवर्ती कार्यालय
मुंबई - ४०० ००१

ए.पी. (डिआयआर मालिका) परिपत्रक क्र.३

जुलै १७, २००३

प्रति
विदेशी चलनातील सर्व अधिकृत डिलर्स

प्रिय महोदया/महोदय,

### चालू खात्यातील व्यवहार - मुक्तिकरण

अधिकृत डिलर्सचे लक्ष विदेशी चलन व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार) नियम, २००० वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे ला अनुसूची ३ अधीन विदेशी चलनाच्या विमोचनासाठी विद्यमान मर्यादेकडे वेधण्यात येत आहे. अधिक मुक्तिकरणाच्या दिशेने एक पाऊल म्हणून विद्यमान मर्यादा खाली सविस्तर दिल्याप्रमाणे वाढविण्याचे ठरविण्यात आले आहे.

| अनु. क्र. | अनुसूचीतील बाब क्र. | हेतू | विद्यमान मर्यादा (युएस डॉलरमध्ये) | प्रस्तावित मर्यादा (युएस डॉलरमध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | ५ | विदेशात नोकरी | ५,००० | १००,००० |
| २ | ६ | विदेशात स्थलांतर | ५,००० | १००,००० |
| ३ | ७(२) | जवळच्या नातेवाईकाच्या विदेशातील देखभालीसाठी | ५,००० | १००,००० |
| ४ | १० | विदेशात शिक्षण | ३०.००० | १००,००० |

२. त्यानुसार अधिकृत डिलर्स उपरोक्त **प्रत्येक** प्रवर्गासाठी नमूद केलेल्या मर्यादेत, पुष्टीकारक कागदपत्रांच्या आग्रहाविना केवळ व्यवहाराची मुलभूत सविस्तर माहिती देणारे स्वघोषित घोषणापत्र आणि फॉर्म ए२ मधील अर्ज सादर केल्याच्या आधारावर रवानगीला परवानगी देऊ शकतो. अधिकृत डिलरने याचीहि खात्री करून घ्यावी कि, अर्जदाराने धनादेश किंवा धनप्रेष किंवा त्याच्या/तिच्या खात्यातून रक्कम वजावट देऊन वोदेशी चलनासाठी प्रदान केले आहे.

**वैद्यकीय उपचार**

३. अधिकृत डिलरचे लक्ष ए.पी.(डीआयआर मालिका), परिपत्रक क्र. १७ दिनांकित सप्टेंबर १२, २००२ कडे वेधण्यात येत आहे ज्यानुसार विदेशातील वैद्यकीय उपचारांसाठी कोणत्याहि रुग्णालयाच्या/ डॉक्टरच्या अंदाजित खर्चासाठी आग्रह न धरता युएस डॉलर ५०००० किंवा त्याच्या सममूल्याच्या बरोबरीने विदेशी चलनाचे विमोचन करता येईल. आता असे ठरविण्यात आले आहे कि, अधिकृत डिलर यापुढे निवासी भारतीयाना विदेशातील वैद्यकीय उपचारांसाठी भारतातील/विदेशातील कोणत्याहि रुग्णालयाच्या/ डॉक्टरच्या अंदाजित खर्चासाठी आग्रह न धरता युएस डॉलर १००,००० किंवा त्याच्या सममूल्यापर्यंतचे विदेशी चलनाचे विमोचन करू शकेल. त्यासंबंधातील परिछ्चेद ३ मध्ये विशद केलेल्या इतर सर्व अटी अपरिवर्तित राहतील.

**समंत्रणा सेवा**

४. त्यापुढे असेहि ठरविण्यात आले आहे कि, भारताबाहेरून समंत्रणा सेवा प्राप्त करण्यासाठी रकमेच्या रवानगीसाठी अनुसूची ३ आबीआयडी च्या बाब ५ मध्ये ठरवून दिलेल्या प्रति प्रकल्प युएस डॉलर १००.०००ची मर्यादा वाढवून युएस डॉलर युएस डॉलर १ दशलक्ष करण्यात यावी. अर्जदाराने त्याना समाधानकारक

कागदपत्रे सादर करण्याच्या अधीन अधिकृत डिलर युएस डॉलर १ दशलक्ष पर्यंतच्या रवानगीला परवानगी देऊ शकतो.

५. विदेशी चलन व्यवस्थापन(चालू खाते व्यवहार), नियम, २००० मध्ये आवश्यक ते बदल वेगळे अधिसूचित केले जातील.

६. अधिकृत डिलर्सनी या सूचनेचे विषय त्यांच्या संबंधित घटकांच्या नजरेला आणावेत.

७. या परिपत्रकातील आदेश विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (१९९९ चा ४२) च्या कलम १०(४) आणि कलम११(१) अधीन निर्गमित करण्यात आले आहेत.

आपला विश्वासू

**ग्रेस कोशी**

**मुख्य महाव्यवस्थापक**